उल्हासनगर महानगरपालिका
ULHASNAGAR MUNICIPAL CORPORATION
दुरध्वनी क:०२५१- २७२०११९ विस्तार क: २७६ फॅक्स: ०२५१-२७२०१०४

Majhi Vasundhara

NATIONAL CLEAN AIR PROGRAMME

दिनांक-२५/१०/२०२४

## पर्यावरण विभाग

## जाहीर आवाहन

उल्हासनगर शहर हद्यीतील सर्व फटाके विक्री करणारे व्यावसायिक व फटाक्यांचा वापर करणारे नागरिक यांना आवाहन करण्यात येते की, भारत सरकार, अधिसुचना क्रमांक G.S.R. ६८२ (E) dt.०५/१०/१९९९ अन्वये १२५ डेसिबल (AI) पेक्षा जास्त आवाज निर्माण करणा-या फटाक्यांचे उत्पादन, विक्री किंवा वापर करण्यास मनाई केली आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार फटाक्यांमध्ये बेरियम सॉल्ट, लिथीयम, अर्सेनिक, लेड, मर्क्युरी यासारखे घटक असणारे फटाके वापरण्यास बंदी आहे. या घटकामुळे विषारी वायु तयार होतात हे वायु प्राणी व वनस्पती या दोघांना घातक आहेत. तसेच जनहित याचिका क्र. १५२/२०१५ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार फटाका विक्रेत्यांनी विस्फोटक व अधिनियम १८८४ आणि त्या अंतर्गत केलेले विस्फोटक नियम २००८ मधील प्रतिबंध व नियम यांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. तरी फटाके विक्रेत्यांनी बंदी असलेले फटाके विक्री करावयाची नाही. तसेच परवानगी असलेले फटाके महापालिकेने निश्चित केलेल्या ठिकाणी परवानगी घेऊनच विक्री करावयाची आहे.

महाराष्ट्र शासनाचे माझी वसुंधरा अभियान ५.० आणि स्वच्छ सर्वेक्षण २०२५ अभियानातंर्गत फटाकेमुक्त, प्लॅस्टिकमुक्त, कचरामुक्त, प्रदुषणमुक्त व पर्यावरणपुरक (ग्रीन फेस्टिवल) सण-उत्सव साजरे करावेत. सदर अभियानांतर्गत नागरिकांनी फटाक्यांचा वापर टाळावा, प्लॅस्टिकचा वापर टाळुन कापडी किंवा कागदी पिशवीचा वापर करावा, सण समारंभामध्ये विघटनशील व पुर्नवापर करण्यायोग्य वस्तुंचा वापर जास्तीत जास्त करावा, पर्यावरणपूरक, प्रदुषणमुक्त दिवाळी साजरी करावी.

तरी येणारी दिवाळी हरित व पर्यावरणपूरक दिवाळी म्हणून साजरी करुया. तसेच ही दिवाळी आनंदी व सुरक्षित राहो, अशा सर्वांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा.

२५/१०/२

(विकास ढाकणे)
प्रशासक तथा आयुक्त
उल्हासनगर महानगरपालिका